# राजेंद्र गोरले यांचा सभापती पदाचा राजीनामा






मी शेतकऱ्यांच्या हितासाठी सदैव प्रामाणिकपणे काम केले. बाजार समितीला कर्जमुक्त करत आर्थिक उत्पन्न वाढवले. मात्र, काही संचालक आर्थिक स्वार्थामुळे माझ्या कार्यपद्धतीचा विरोध करत होते. त्यांच्या मते, माझ्या कार्यकाळात घेतलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयांना काही संचालकांनी विरोध केला. काही प्रकरणे जुनी असून ती राजकीय हेतूने पुढे आणण्यात आली. त्यामुळे मीच पद सोडण्याचा निर्णय घेतला.

**-राजेंद्र गोरले,**
सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, अचलपूर.

## अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीत राजकीय उलथापालथ

**मो.अजहरुद्दीन**

**अचलपूर, ( दि.3 )-** अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती राजेंद्र गोरले यांनी सोमवारी ( दि.3) आपल्या पदाचा राजीनामा दिला. 13 संचालकांनी त्यांच्याविरोधात अविश्वास प्रस्ताव दाखल करण्यापूर्वीच त्यांनी हा निर्णय घेतला, ज्यामुळे तालुक्यातील सहकार आणि राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

गेल्या काही महिन्यांपासून समितीच्या कामकाजावरून संचालकांमध्ये नाराजी होती. अखेर, 13 संचालकांनी एकत्र येऊन अविश्वास प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे दाखल केला. जिल्हा उपनिबंधकांकडेही त्याबाबतचे पत्र देण्यात आले.

### अविश्वास प्रस्तावाच्या बाजूने कोण ?

13 संचालक अविश्वास प्रस्तावाच्या बाजूने आहेत, त्यामध्ये काँग्रेस चे अमोल चिमोटे, रविंद्र पाटील, सुधीर रहाटे, ज्ञानदेव पाटील, वर्षा आवारे, बाबुराव गावंडे, अनिल पवार, अमोल बोरेकारसमता पॅनल चे प्रतिभा ठाकरे, गोपाल लहाने, भाजपचे अतुल वाठ, अजिंक्य अभ्यंकर प्रहार चे पोपट घोडेराव यांचा समावेश आहे. राजेंद्र गोरले यांच्यासोबत 5 संचालक अलिप्त राहिले, त्यात सतिश पाटील, प्रहारचे नितिन आगे, सतिश व्यास, भावेश अग्रवाल यांचा समावेश आहे.

### राजकीय घडामोडींची मालिका

मार्च 2023 मध्ये झालेल्या निवडणुकीत बबलू देशमुख आणि अजय पाटील यांच्या सहकार पॅनलचे 14 संचालक, तर प्रहार पॅनलचे 4 संचालक विजयी झाले होते. सहकार पॅनलकडून राजेंद्र गोरले यांना सभापती तर अमोल चिमोटे यांची उपसभापती म्हणून निवड करण्यात आली होती. यानंतर जिल्हा बँकेत सत्तापालट झाली. राजेंद्र गोरले यांची बच्चू कडू यांच्याशी घनिष्ठता वाढली, आणि बबलू देशमुख यांनी त्यांच्यावर टीका केली. त्यानंतर गोरले समर्थक आणि विरोधक यांच्यात मतभेद वाढत गेले.

### नव्या सभापतीच्या निवडीसाठी हालचाली सुरू

गोरले यांच्या राजीनाम्यानंतर आता नव्या सभापतीसाठी चर्चा सुरू झाली आहे. प्रतिभा प्रशांत ठाकरे यांचे नाव आघाडीवर असल्याची माहिती मिळत आहे. या घडामोडींमुळे अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीत राजकीय अस्थिरता निर्माण झाली असून, पुढील काही दिवसांत नवा सभापती निवडण्याच्या हालचाली गतीमान होतील.

# घरातून चोरट्यांनी चोरला 2.76 लाखांचा ऐवज

## पुसदा गावातील पहाटेची घटना

## संशयितावर गुन्हा दाखल



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.3 )-** वलगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीतील पुसदा गावात चोरट्यांनी पहाटे घराला लक्ष्य करून 2.76 लाख रुपयांचा ऐवज पळविला. ही घटना 2 फेब्रुवारीच्या पहाटे घडली. याप्रकरणी राजू मन्साराम कोकरे (वय 52, रा. पुसदा) यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी संशयित आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

फिर्यादीनुसार, 1 फेब्रुवारी रोजी रात्री 10.30 वाजता राजू मन्साराम हे कोकरे कुटुंबियांसोबत जेवण करून झोपायला गेले. त्यानंतर ते रात्री दीड वाजता घरातील शौच करण्यासाठी उठले त्यावेळी सामान व्यवस्थित होते. त्यानंतर पहाटे 5 वाजता त्यांना जाग आली असता घराच्या मागील दरवाजाची साखळी तुटलेली दिसली. बेडरूममध्ये गेल्यावर त्यांना लोखंडी कपाट उघडे दिसले. त्यानंतर राजू कोकरे यांनी ही माहिती पत्नी व इतर नातेवाईकांना दिली. अज्ञात चोरट्यांनी कपाटाच्या लॉकरमधून 80 हजार रुपये रोख, सोन्याची गहू चेन, कानातले, अंगठी, 10 हजार रुपये व इतर रोख असा 2 लाख 76 हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. राजू कोकरे यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी तिघा संशयितांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# होप हॉस्पीटलला आग

## तीन दिवसात तिसरी मोठी आग




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.3 )-** शहरात गेल्या तीन दिवसात तिसरी मोठी आग लागल्याचे पहायला मिळाली. शनिवारी वल्लभ भुवन व एका ऑटोमोबाइलच्या दुकानाला आग लागल्याची घटना समोर आली होती. त्यानंतर सोमवारी (दि.3) लहान मुलांचा दवाखाना होप हॉस्पीटलला आग लागल्याची घटना समोर आली. रात्री उशिरापर्यंत अग्निशमन बंबाव्दारे आग विझविण्याची प्रक्रीया सुरु होती.

## फायर सेप्टी ऑडीट व अग्निसुरक्षेची तपासणी



महापालिका प्रशासनाकडून 3 फेब्रुवारी रोजी शहरातील विविध व्यापारी प्रतिष्ठानातील सेप्टी ऑडिट व अग्निसुरक्षेची तपासणी करण्यात आली. वल्लभ भुवन येथील भिषण आगीनंतर महापालिकेने ही कार्यवाही सुरु केली आहे. चित्रा चौकातील धोराजी स्विट्स अँड नमकिन, मथुरा जलेबी, आर.वी. धोराजीवाला, बनारसी भोजनालय, गुजरात कांती भुवन, न्यु कन्हैया कोल्ड्रिंग्स अँड रेस्टॉरंट्स, वल्लभ भुवन या आस्थापनांची पाहणी महानगरपालिका उपआयुक्त डॉ.मेघना वासनकर यांनी पाहणी केली. सदर आस्थापनांची पाहणी केली असता महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम 20063 सुधारीत 2023 व एन.बी.सी. नुसार अग्निशमन यंत्रणा आढळून आलेली नाही. सदर आस्थापनाचे फायर सेप्टी ऑडीट व अग्निशमन यंत्रणा नियमानुसार करुन अहवाल अग्निशमन विभागात पंधरा दिवसात सादर करण्याच्या सुचना उपआयुक्त डॉ.मेघना वासनकर यांनी दिल्या. यावेळी उपआयुक्त डॉ.मेघना वासनकर यांनी अमरावती शहरातील नागरिकांनी महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 सुधारीत 2023 व एन.बी.सी.2016 ची काटेकोरपणे पालन करून आपल्या जिविताचे व मालमत्तेचे आगीपासून होणारे नुकसान टाळण्याचे तसेच अग्निशमन यंत्रणा करून अग्निशमन विभागाकडून अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र घेण्यात यावे असे आवाहन केले आहे. यावेळी सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी लक्ष्मण पावडे, प्र.अग्निशमन अधिक्षक संतोष केंद्रे, फायरमन गौरव दंदे, गोविंद घुले, राहुल घोडे,मोहन वानखेडे, संदीप रामेकर, वाहन चालक तौसीफ उपस्थित होते.

# आदिवासी बांधवांच्या उत्कर्षासाठी सर्वोतोपरी प्रयत्न

## आदिवासी विकासमंत्री डॉ. अशोक उईके




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.3 )-** देशातील विविधता, सामाजिक समृद्धी आणि एकात्मता टिकून राहण्यासाठी संस्कृतीचे जतन होणे आवश्यक आहे. आदिवासी समाजातील सांस्कृतिक वारसा, भाषा, कला आणि परंपरेचे संवर्धन करण्यासाठी भर देणार. आदिवासी बांधवांच्या उत्कर्षासाठी शासन कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन आदिवासी विकासमंत्री डॉ. अशोक उईके यांनी आज येथे केले.

सामाजिक न्याय भवन येथे जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, आदिवासी विकास विभाग, आदिवासी विकास महामंडळ, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचा आढावा डॉ. उईके यांनी घेतला, त्यावेळी ते बोलत होते. आमदार किरण सरनाईक, आमदार केवलराम काळे, आमदार प्रविण तायडे, आमदार उमेश यावलकर, आमदार राजेश वानखडे, आमदार गजानन लेवटे, प्रविण पोटे-पाटील, एमआयडीसीचे किरण पातुरकर, आदिवासी विकास अपर आयुक्त जितेंद्र चौधरी, धारणी प्रकल्प अधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

मंत्री उईके म्हणाले, आदिवासी समाजाच्या हक्कांचे संरक्षण आणि उत्कर्षासाठी शासन विविध योजना राबवित आहे. आदिवासींचे प्रश्न समजून घेण्यासाठी लवकर मेळघाटचा दौरा करण्यात येईल. त्यानुसार तेथील प्रश्नांवर तातडीने उपाययोजना करण्यात येतील. नवसारी वसतिगृहाजवळील कचरा काढून ती जागा त्वरित स्वच्छ करण्यात यावी. डीबीटी वेळेवर देण्यात येईल. सर्व पात्र विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश मिळेल. स्थानिकांची गरज लक्षात घेऊन आदिवासी बांधवांच्या हाताला काम देण्यात येईल. वन हक्क जमीन पट्ट्यांपासून आदिवासी वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्यात येईल. शासकीय वसतिगृह, आश्रम शाळांमध्ये सर्व आवश्यक सोयी -सुविधा निर्माण करण्यात येईल. प्रत्येक आदिवासी महिलेला सन्मानपूर्वक वागणूक दिल्या जाईल. आदिवासींच्या समस्या सोडविण्यावर भर देणार, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळीसामाजिक संघटनेचे प्रतिनिधी, आदिवासी विद्यार्थी-विद्यार्थिनी, नागरिक यांच्याशी डॉ. उईके यांनी संवाद साधला, त्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि त्यावर त्वरित उपाययोजना आखण्यासाठी संबंधितांना सूचित केले. डॉ.उईके यांनी सकाळी श्री. शिवाजी शिक्षण संस्थेतील डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, संस्थेचे उपाध्यक्ष ड. गजाननराव पुंडकर, ?ड. जे.व्ही.पाटील पुसदेकर आदी उपस्थित होते.

# मध्यप्रदेशात सैर करणाऱ्या रोकड वाहन प्रकरणी चौकशी

## जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षांनी केले स्पष्ट

## खुलासा मागवून समाधान न झाल्यास कारवाई

## दैनिक महासागर च्या बातमीचा दणका

**बादल डकरे**

**चांदूर बाजार,( दि.3 )-** अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची(एडीसीसी) रोकड वाहन मध्यप्रदेश मधील खोमाई या गावात दिसल्याने ही गाडी नक्की कश्याकरिता या मार्गे कोठे जात आहे, असा प्रश्न निर्माण झाला आहे. या बाबत दैनिक महासागर ने 3 फेब्रुवारीच्या अंकात वृत्त प्रकाशित केले होते. रोकड वाहनाचा रूट कसा बदलला गेला. रूट बदलविण्यासाठी या ठिकाणी नियमाची पायमल्ली करण्यात आली. ही अत्यंत गंभीर बाब असताना या प्रकरणी दोषींची चौकशी होवून कारवाई होणे गरजेचे आहे. बँकेचे अध्यक्ष ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू यांनी याप्रकरणी चौकशी करुन


महासागर

# एडीसीसी बँकेच्या रोकड वाहनाची मध्यप्रदेशात सैर

## रोकड घेवून जाणारी व्हॅन भरकटली कशी ? चौकशी गरजेची

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार, ( दि.2 ) -** अमरावती जिल्हा मध्यवर्ती बँकेची (एडीसीसी) रोकड पोहोचवणारी एमएच 27/ बीएक्स 6642 या क्रमांकाचे वाहन मध्य प्रदेशाची सैर करुन पुन्हा महाराष्ट्रात येत असल्याने नेमका हा रूट कसा ? असा प्रश्न निर्माण झाला आहे. याप्रकरणी चौकशी व्हावी, अशी मागणी बँकेच्या ग्राहकाकडून केली जात आहे.

जिल्हा मध्यवर्ती बँकेचा शाखेचा रुपाने संपूर्ण जिल्ह्यात विस्तारलेली आहे. धारणी व चिखलदरा तालुक्याच्या अनेक गावांपर्यंत बँकेच्या शाखा आहे. या बँकेच्या मुख्य कार्यालयातून या शाखांना रोकड पुरविली जाते. शनिवार (दि.1) एमएच 27/ बीएक्स 6642 या क्रमांकाची गाडी मध्यप्रदेशाच्या खोमाई या ठिकाणी दिसल्याने नेमका या वाहनाचा हा रूट कसा ? की अधिकारी आपल्या मर्जी नुसार या मार्गी जात आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी आम्ही चुरणी या ठिकाणी जात असल्याचे सांगितले. चूरणी जाण्यासाठी परतवाडा वरून दोन मार्ग आहे. तसेच तो रोड देखील चांगला आहे. मात्र हा मध्यप्रदेशचा मार्ग कसा काय तयार करण्यात आला हा एक संशोधनाचा भाग आहे. जिल्हा मध्यवर्ती बँकेचा हा प्रकार अध्यक्ष यांच्या लक्षात नाही का ? हा देखील प्रश्न आहे. या संदर्भात जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष बच्चू कडू यांच्यासोबत भ्रमणध्वनीवर संपर्क केला असता संपर्क झाला नाही तर संचालक याप्रकरणी चौकशीची मागणी करतील का ? हा प्रश्न आता सध्या उपस्थित आहे. मात्र महाराष्ट्राची गाडी मध्यप्रदेश मार्गे परत महाराष्ट्रात येते हा काही प्रकार न समजण्यासारखा आहे. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी

03 Feb 2025 - Page 2 | dainikmahasagar.com
Powered by softisky.com

या प्रकरणी संपूर्ण चौकशी करून वाहन त्या मार्गे गेले कसे याबाबत चौकशी केली जाईल. चौकशी अंति कुणी दोषी आढळल्यास संबंधितावर कारवाई नक्की करण्यात येईल. तसेच ते वाहन त्या मार्गे कोणाच्या सांगण्यावरून पाठविण्यात आले, याची देखील चौकशी केली जाईल.

**-बच्चू कडू,**
अध्यक्ष एडीसीस बँक, अमरावती.

### सिईओवरही कारवाई ची टांगती तलवार ?

आपल्या बँकेची रोकड घेऊन जाणाऱ्या वाहनाचा मार्ग बदलला जातो आणि मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना (सिईओ) सोमवार पर्यंत माहिती न होणे हा प्रकार गंभीर असून याप्रकरणी अध्यक्ष आणि संचालक मंडळाकडून मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांवर देखील कारवाईची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे याप्रकरणी निष्पक्ष चौकशी होणे गरजेचे आहे.

याप्रकरणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक आनंद काळे यांच्यासोबत भ्रणध्वनीक्रमांक वरून संपर्क केला असता त्यांनाही या प्रकरणाची माहिती नव्हती, तर सहकारी बँकेचे अध्यक्ष उपाध्यक्ष अभिजित ढेपे यांनी सुद्धा या प्रकरणाची माहिती नसल्याचे दिसून आले. त्यामुळे संचालक व उपाध्यक्ष यांना या प्रकरणाची माहिती नसताना वाहनाचा मार्ग चालकाने आपल्या सोयीनुसार का बदलविला, असाही प्रश्न निर्माण झाला आहे. याप्रकरणी चौकशी काय निष्पन्न हे पाहण्यासारखे राहील.

### नियमाची पायमल्ली ?

कुठल्याही बँकेच्या रोकड वाहनालाही आरबीआयच्या नियमानुसार काही अटी व शर्ती घालून दिलेल्या असतात. मात्र या अटी व शर्ती पाळल्या जात नसल्याचे दिसत आहे. यापूर्वी देखील ते वाहन किती वेळा खोमई मार्गे गेले यांची पण चौकशी होणे गरजेचे आहे. या प्रकरणी आता नेमकी पारदर्शक चौकशी होते, की प्रकरण दडपले जाते हा विषय पाहण्यासारख्या राहील.

झालेला प्रकार हा अत्यंत गंभीर असून या प्रकरणी संबंधित ड्रायव्हर आणि अधिकारी यांना खुलासा मागितला जाईल.

**-राजेंद्र बकाल,**
मुख्य कार्यकारी अधिकारी एडीसीसी बँक, अमरावती.

# कारच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

## परतवाडा मार्गावरील घटना



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.3 )-** वलगाव पोलीस स्टेशनच्या हद्दीतील परतवाडा रस्त्यावर भरधाव कारच्या धडकेत दुचाकीवरील तरुणाचा मृत्यू झाला. शुभम विनोदराव कुसराम (29, रा. खाजमानगर) असे मृताचे नाव आहे. ही घटना अमरावती ही घटना वायगाव ते आष्टीदरम्यानच्या रस्त्यावर रविवारी रात्री 10ः30 ते 11ः00 वाजताच्या सुमारास घडली.

भरधाव कार क्रमांक जीजे 05 आरझेड 7382 ने शुभमच्या दुचाकी क्रमांक एमएच 27/ डीडब्ल्यू 2577 ला जोरदार धडक दिली. या अपघातानंतर शुभम हा रस्त्यावर कोसळला आणि गंभीर जखमी झाला होता. या अपघातानंतर काही नागरिकांनी घटनेची माहिती 108 रुग्णवाहिकेला दिली. त्यानंतर शुभमला जखमी अवस्थेत 108 ?म्बुलन्समध्ये औषध उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु डॉक्टरने तपासणीदरम्यान त्याला मृत्यू घोषित करण्यात आले. त्यानंतर काही नागरिकांच्या मदतीने ही माहिती मृताच्या नातेवाईकांना देण्यात आली. या घटनेची माहिती वलगाव पोलीसांना मिळताच, पोलिस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून कार चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे प्रक्रिया सुरू होते. पुढील तपास वलगाव पोलीस करत आहेत.

RNINO-46973/1986 महासागर वाशीम
मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर-१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,महात्मा फुले मार्केट,पाटणी चौक,वाशीम येथे प्रकाशित केले. संपादक-श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन-०७१२-२७६७६२२८-९३७३११७०४२ स्थानिक संपादक-नितीन पगार मो.नं.९८२२७४९४७० (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहिल.)